राज्य योजना सन २०१७-१८ शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन (आपटा) (२४०६ ०४६१) आपटा पानांच्या विक्री / खरेदी बाबत ई-निविदा पध्दतीने लिलाव करणेकरीता वृत्तपत्रात जाहिरात देणेकरिता निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांकः- आपटा-२०१७/प्र.क्र.३७४/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०७ ऑक्टोबर २०१७

वाचा :- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जून, २०१७
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष १/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.११६५/२०१७-१८, दिनांक १३.०९.२०१७.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम १९६९ मधील तरतुदीनुसार सन १९७७-७८ पासून आपटा पानांच्या घटकांची विक्री व खरेदीची एकमुक्त पध्दती प्रमाणे करण्यात येत होती. तथापि, सन २०१६ पासून (बिगर अनुसूचित क्षेत्रातील) ई-निविदा पध्दतीने सदरची लिलाव प्रक्रिया अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेमार्फत ही प्रक्रिया राबविली जात आहे. सदर प्रक्रियेमध्ये मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांना केंद्र अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. ठाणे वनवृत्ताअंतर्गत ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर व धुळे या वनवृत्ताचे ३१ घटक असून, सदर घटकांच्या विक्री करीता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेमार्फत ई-निविदा पध्दतीने लिलाव करणेकरीता वृत्तपत्रात जाहिरात देणेकरिता सन २०१७-१८ या राज्य योजनांतर्गत योजना शासकीय अभिरणावरुन समुपयोजन (आपटा) (२४०६ ०४६१) या योजनेकरीता रु.००.२५ लक्षचा प्रस्ताव सादर केला होता.

०२. सन २०१७-१८ पासून शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन (आपटा) (२४०६ ०४६१) ही योजना योजनेत्तर मधुन योजनांतर्गत वर्ग करण्यात आलेली आहे. या योजनेकरिता रुपये २.०० लक्ष नियतव्यय मंजुर व अर्थसंकल्पित आहे.

०३. वार्षिक योजना सन २०१७-१८ पासून शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन (आपटा) (२४०६ ०४६१) या योजनेतून आपटा पानांच्या विक्री / खरेदी बाबत ई-निविदा पध्दतीने लिलाव करणेकरीता वृत्तपत्रात जाहिरात देणेकरिता रू.०.२५ लक्ष इतका निधी वितरीत करणेसाठी संदर्भ क्र.२ अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्ताव सादर करुन निधी वितरीत करण्यास शिफारसीसह विनंती केली आहे. त्यानुसार या कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

वार्षिक योजना सन २०१७-१८ राज्य योजनेअंतर्गत आपटा पानांच्या विक्री / खरेदी बाबत ई-निविदा पध्दतीने लिलाव करणेकरीता वृत्तपत्रात जाहिरात देणेकरिता रू.०.२५ लक्ष इतका निधी (४४०६ ०४६१) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे. वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतच्या तरतूदीचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

२. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकते नुसार आहरण करावे.

३. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

४. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्र.सी-७, प्रधान शिर्ष- २४०६, वनिकरण व वन्यजीवन, (०१) (०२) शासकिय अभिकरणाकडून समुपयोजन (आपटा) (२४०६ ०४६१) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करीता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००७१५३८३३७५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2017.10.07 15:27:21 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे
५. उप वनसंरक्षक, ठाणे, डहाणू, जव्हार शहापूर, अलिबाग, रोहा.
६. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
७. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
८. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)